# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०३ ऑगस्ट, २०१६ / श्रावण १२, १९३८ ( शके )**

**(१) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री**
**(२) आदिवासी विकास मंत्री**
**(३) उद्योग मंत्री**
**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री**
**(५) सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री**
**(६) सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४२**

---

### चंद्रपूर येथील जाम-चंद्रपूर-आसिफाबाद मार्गावरील रेल्वे लेवल क्रॉसींग ९३ वर उड्डाणपुल बांधण्याबाबत

**(१) * ६३६८२ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथून जाणाऱ्या जाम-चंद्रपूर-आसिफाबाद मार्गावर राजुरापासून २ कि.मी. अंतरावरील दिल्ली चेन्नई रेल्वे मार्गावरील लेवल क्रॉसींग ९३ वर उड्डाणपुलाच्या बांधकामाला सन २००८-०९ मध्ये मंजूरी मिळाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील चार वर्षापासून या पुलाच्या बांधकामासाठी निधीची तरतूद करण्यात आली नसल्यामुळे सदर उड्डाणपुलाचे बांधकाम प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर उड्डाणपुलाच्या प्रलंबित असलेल्या बांधकामाकरिता शासन निधी उपलब्ध करुन देणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय खरे आहे.
शासनाच्या दि.२०/३/२०१० रोजीच्या शासन निर्णयाव्दारे रु. १७.०० कोटी रकमेच्या कामास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(२) प्रश्नांकित कामापैकी रेल्वे उड्डाण पुलाचे भारतीय रेल्वे मार्फत व जोडरस्त्यांचे काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येणार आहे. रेल्वे मार्फत हाती घेण्यात आलेल्या रेल्वे पुलाचे काम करण्यास विलंब झाला आहे. त्यामुळे जोडरस्ते व त्यामधील व्हायाडक्टचे काम करणे शक्य झालेले नाही. या कामासाठी आतापर्यंत रु. १८.६९ कोटी इतकी रक्कम खर्च झाली आहे. या पूलाची किंमत वाढली असुन ती रु. २४.५३ कोटी इतकी होणे अपेक्षीत आहे. त्यामुळे या प्रकल्पाचे सुधारीत अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

प्रकल्पाच्या कामास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यावर व रेल्वे मार्फत पुलाचे काम पुर्ण झाल्यावर जोड रस्त्याची उर्वरीत कामे पूर्ण करुन निधीच्या उपलब्धतेनुसार काम पुर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## साजगांव-आडोशी व सावरोली- इसांबाफाटा (ता.खालापूर, जि.रायगड) या रस्त्यांची झालेली दुरावस्था

**(२) * ५३७३४ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साजगांव-आडोशी व सावरोली-इसांबाफाटा (ता.खालापूर, जि.रायगड) या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रस्त्यावर अनेक छोटे-मोठे अपघातही घडत असल्याने शासनाने याची पाहणी केली आहे काय,
(३) तसेच या रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नांकीत रस्त्यावर पावसाळयात काही प्रमाणात खड्डे पडले आहेत, हे खरे आहे.
(२) सदर रस्त्यावर मार्च, २०१६ ते जून, २०१६ या कालावधीत अपघात झाले नसल्याचे पोलिस अहवालावरुन दिसून येते.
(३) व (४) साजगांव आडोशी या रस्त्याच्या लांबीत १.५०० कि.मी. लांबीच्या भागात रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम मंजूर असून निविदास्तरावर आहे. सद्यस्थितीत उपरोक्त लांबीमध्ये पावसाळयामध्ये खडी व ग्रीटने खड्डे भरुन रस्ता सुस्थितीत ठेवण्यात आला असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.

सावरोली इसांबाफाटा या १.५०० कि.मी. लांबीच्या रस्त्यावरील मजबुतीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून डांबरीकरणाचे काम पावसाळयानंतर हाती घेवून पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## शहापुर (जि. ठाणे) तालुक्यातील नेहरोली - कामतवाडी रस्त्याचे काम सुरु करण्याबाबत

**(३) * ५५०९७ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापुर (जि.ठाणे) तालुक्यातील नेहरोली - कामतवाडी रस्त्याचे काम त्वरित सुरु करण्यात यावे या मागणीसाठी कामतवाडी येथील आदिवासींतर्फे शहापुरच्या सार्वजनिक बांधकाम उपविभाग कार्यालयावर दिनांक २५ मे, २०१६ रोजी मोर्चा काढून आंदोलन करण्यात आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मंजूर रस्त्याचे काम शासनाने बंद ठेवण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू रस्त्याअभावी येथील आदिवासींची गैरसोय होत असून उक्त रस्त्याचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नांकीत रस्त्याच्या कामासाठी दि. २५/५/२०१६ रोजी काही ग्रामस्थ उप अभियंता, शहापूर यांचे भेटीकरीता त्यांचे कार्यालयात आले होते.
(२), (३) व (४) प्रश्नांकीत रस्त्याची लांबी ही १.९२० कि.मी. एवढी आहे. सदर लांबीपैंकी १.०० कि.मी. रस्त्याचे काम प्रगतीत आहे. उर्वरित ०.९२० कि.मी. लांबीच्या रस्त्याचे काम निविदास्तरावर आहे.
सदर काम पावसाळा संपल्यानंतर सुरु करुन निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

**आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील आदिवासी भागातील लाभार्थ्यांना पडकई योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागल्याबाबत**

**(४) * ६३८८९ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आंबेगाव (जि.पुणे) तालुक्यातील आदिवासी भागातील शेतकऱ्यांची डोंगर उताराची जमीन लागवडीखाली यावी या उद्देशाने शासनाने सन २००४ मध्ये प्रायोगिक तत्वावर पडकई योजना राबविली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी भागातील ११०० लाभार्थ्यांना मागील तीन वर्षांपासून पडकई योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, कामाच्या मोबदल्याची २ कोटी रुपये देणी अद्याप त्यांना मिळाली नसल्याने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सन २०१३-१४ मध्ये आंबेगाव तालुक्यात ४५ गावात ७८.०८ हे. पडकईचे काम झाले आहे. त्यावर रू.२००.०० लक्ष निधी खर्च झाला असून १०७७ लाभार्थ्यांना लाभ मिळाला आहे. सन २०१४-१५ मध्ये आंबेगांव तालुक्यातील ११५९ आदिवासी शेतक-यांनी ८६.५३ हेक्टर क्षेत्रावर पडकईचे काम केले असून ११२२ लाभार्थ्यांचे १७७.३० लक्ष अनुदान देणे बाकी आहे.

(३) व (४) विशेष केंद्रीय सहाय्य अंतर्गत सन २०१४-१५ मध्ये पुणे जिल्हयासाठी रु.६३७.६३ लक्ष वितरीत करण्यात आला होता. तथापि, सदर योजना राबविण्यासाठी अटी व शर्तीनुसार लाभार्थी हा दारिद्रय रेषेखाली असणे बंधनकारक होते. आंबेगाव तालुक्यात दारिद्रय रेषेखाली शेतकरी नसल्याने प्राप्त निधी खर्च होऊ शकला नाही.

या संदर्भात मा.पालकमंत्री पुणे आणि मा. मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत बैठक झाली. सदर बैठकीत राज्य योजनेतून निधी मिळण्याबाबत प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

-----------------

**धारणी (जि.अमरावती) येथील आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प कार्यालयात कायमस्वरुपी अधिकारी नसल्याबाबत**

**(५) * ५५८५४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारणी (जि.अमरावती) येथील आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प कार्यालयासोबत जिल्हयातील सात प्रकल्प कार्यालयांचे नियोजन अमरावतीतून चालते परंतु अमरावतीच्या प्रकल्प कार्यालयात अप्पर आयुक्त आणि उपायुक्त या दोन्ही महत्वाच्या पदांवर सात महिन्यांपासून कायमस्वरुपी अधिकारी नाहीत तसेच प्रकल्प कार्यालयातील काही अधिकारी दलालांशी संगनमत करुन शासकीय निधीत गैरव्यवहार करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच शासनाने एकात्मिक आदिवासी विकास योजनेअंतर्गत ठक्कर बाप्पा योजना, पारधी घरकुल योजना, शबरी घरकुल योजना इ. योजनांसाठी धारणी (जि.अमरावती) क्षेत्राला दिलेला ७ कोटी ६४ लक्ष रुपयांचा निधी स्थानिक अधिका-यांनी योजनेवर खर्च न करता शासनाकडे परत पाठविला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधीतून विकासकामे न करता शासनास निधी परत पाठविणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त अधिकाऱ्यांवर शासनाने कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच प्रश्न भाग (१) मधील नमूद पदे कधीपर्यंत भरण्यात येणार आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अमरावतीच्या प्रकल्प कार्यालयात अप्पर आयुक्त आणि उपायुक्त या दोन्ही पदांवर सात महिन्यांपासून कायमस्वरुपी अधिकारी नव्हते, हे खरे आहे. तथापि, या विभागाच्या दिनांक २४.०५.२०१६ च्या आदेशानुसार सदर दोन्ही रिक्त पदे भरण्यात आलेली असून, दिनांक ०१.०६.२०१६ पासून सदर पदांवर नियमित स्वरुपात अधिकारी कार्यरत आहेत.

तसेच प्रकल्प कार्यालयातील काही अधिकारी दलालाशी संगनमत करुन शासकीय निधीचा गैरव्यवहार करीत आहेत हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : संकिर्ण-१०१५/ प्र.क्र.१८/अर्थोपाय, दिनांक २५.०८.२०१५ अन्वये देण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर अखर्चित निधी शासनाकडे परत पाठविण्यात आलेला आहे.

(३) असे कोणत्याही प्रकारचे निवेदन या विभागास प्राप्त झालेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चोपडा (जि.जळगांव) तालुक्यात सामाजिक न्याय विभागाचे शासकीय वसतीगृह व निवासी शाळा मंजूर करण्याबाबत

**(६) * ६०३११ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा (जि.जळगांव) तालुक्यात सामाजिक न्याय विभागाचे एकही शासकीय वसतीगृह व निवासी शाळा नसल्यामुळे तालुक्यात सामाजिक न्याय विभागाचे मुलांचे १ व मुलींचे १ शासकीय वसतीगृह व निवासी शाळा मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय विभाग यांच्याकडे पत्रव्यवहार करुन मागणी करुनही अद्‌याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शासकीय वसतीगृह व निवासी शाळा मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) चोपडा (जि.जळगाव) तालुक्यात सामाजिक न्याय विभागाचे शासकीय वसतिगृह व निवासी शाळा सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि. ३/०२/२०१५ व दि. १/०४/२०१५ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झाले असून सदर प्रकरणी आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रचलित नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग नांदेड यांनी महामार्ग दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार केल्याबाबत

**(७) * ६४४३९ श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग नांदेड, उपअभियंता, राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, मानवत, नांदेड व भोकर तसेच त्यांचे अंतर्गत येणारे शाखा अभियंता यांनी सन २०१५-१६ या वर्षात महामार्ग दुरुस्तीच्या कामात सुमारे २ कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याची तक्रार मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे दिनांक १६ जून, २०१६ रोजी काही नागरिकांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३ लाख रुपयांवरील कामांचे ई-टेंडर काढावे लागणार असल्याने २ लाख ८८ हजार ते २ लाख ९८ हजार अशा किमती ठरवून कामे देण्यात आली, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या कामांसाठी निधी देण्यात आला ती कामे पूर्ण न होताच निधी देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी सदर रस्त्यांच्या कामाबाबत तक्रार प्राप्त झाल्यामुळे सदर तक्रारीबाबत प्राथमिक चौकशी करण्याबाबत मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग प्रादेशिक विभाग, कोकण भवन, नवी मुंबई यांनी दि.२५/०७/२०१६ रोजी अधीक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना कळविले आहे. चौकशी अहवाल शासनास प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## सुरडी व शेडाला (ता. आष्टी, जि.बीड) येथील आश्रमशाळेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(८) * ६२४०६ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरडी (ता.आष्टी, जि.बीड) येथील आश्रमशाळेच्या नवीन इमारतीचे बांधकाम अतिशय संथगतीने सुरु असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच शेडाला (ता.आष्टी, जि.बीड) येथील आश्रमशाळा जुनी असल्याने सद्यस्थितीत मुलांची गैरसोय होत असल्याने सदरहू आश्रमशाळेची नवीन इमारत उभारण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांच्या अनुषंगाने सुरडी येथील आश्रमशाळेचे काम त्वरित पूर्ण करण्याबाबत व शेडाला येथे नवीन इमारत उभारण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) तसेच सदरहू इमारतींच्या बांधकामासाठी किती रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला आहे आणि किती कालावधीत सदरहू इमारतीचे बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे;

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

सुरडी, ता. आष्टी, जि. बीड येथे शासकीय आश्रमशाळा इमारतीचे बांधकाम सुरू नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३), (४) व (५) शासकीय आश्रमशाळा, सुरूडी, ता. आष्टी, जि. बीड या शाळेच्या नवीन इमारत बांधकाम आराखडा तयार करण्याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांना आयुक्त, आदिवासी विकास यांनी सूचना दिल्या आहेत.

तसेच शासकीय आश्रमशाळा, शेडाळा येथील इमारत बांधकाम रू.२००५.३५ लक्ष रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर कामाचा अर्थसंकल्पिय भाग ३ परिशिष्ट ड मध्ये समावेश करून निधी उपलब्ध करून देणेबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

-----------------

## पैठण एमआयडीसीतील केमिकल कंपनीमध्ये कॉम्प्रेसिव्ह मशिनचा झालेला स्फोट

**(९) * ५७५९३ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण एमआयडीसीतील केमिकल कंपनीमध्ये दिनांक २३ मे, २०१६ रोजी कॉम्प्रेसिव्ह मशिनचा स्फोट झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्फोटाची चौकशी पोलीसांनी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर स्फोटात किती कामगारांचा मृत्यू झाला व किती जखमी झाले आहेत,

(४) असल्यास, मृत कामगारांच्या कुटूंबियांना व जखमी कामगारांवर औषधोपचार करण्यासाठी कोणती मदत केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील :** (१) हे खरे नाही.

सदरचा स्फोट हा नायट्रो ग्लिसरीन हे रसायन हाताळताना झाला असून कॉम्प्रेसिव्ह मशिनचा स्फोट झालेला नाही.

(२) होय.

सदर स्फोटाची चौकशी पोलिसांनी केली आहे.

(३) सदर स्फोटात एक कामगार मृत पावला असून कोणीही जखमी झालेले नाही.

(४) मृत कामगाराच्या कायदेशीर वारसदारास देय असलेली नुकसान भरपाईच्या रु.१२,००,०००/- रकमेचा धनादेश कारखान्याच्या भोगवटादाराने कामगार न्यायालय, औरंगाबाद येथे जमा केला आहे. तसेच मृत कामगाराच्या कुटूंबियास रु.५०,०००/- सानुग्रह अनुदान देण्यात आले आहे.

(५) सदर प्रकरणी मा.मुख्य न्यायदंडाधिकारी औरंगाबाद, यांच्या न्यायालयात फौजदारी खटला क्र.६०७७/२०१६ दाखल करण्यात आला आहे.

-----------------

**तुसे-मोज (ता.वाडा,जि.पालघर) तसेच औंदा (ता.जि.पालघर) या दोन्ही मार्गावरील पुलाचे करण्यात आलेले बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१०) * ६१५७६ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुसे-मोज या मार्गावर (ता.वाडा, जि.पालघर) सुमारे ८० लाख रुपये खर्च करुन सन २०१३ ते २०१६ दरम्यान केलेले पूलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाले असून पूलाला भेगा पडल्या आहेत तसेच औंदा (ता.जि.पालघर) येथे करण्यात आलेले पुलाचे बांधकाम सुद्धा निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषी अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**भूदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील औद्योगिक प्रकल्पासाठी संपादित जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(११) * ५७१७७ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.प्रकाश अबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भूदरगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील भुतोबा पठारावर औद्योगिक प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून सदर प्रकल्पासाठी संपादित जमिनीचा मोबदला शासनाने अद्याप शेतकऱ्यांना दिला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकल्प तातडीने कार्यान्वित करणेबाबत तसेच सदर प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) भूदरगड (जि.कोल्हापूर) औद्योगिक क्षेत्रासाठी ५२.८२ हे.आर क्षेत्राच्या नुकसान भरपाईच्या दरासंबंधी प्रादेशिक अधिकारी, कोल्हापूर व उपविभागीय अधिकारी,आजरा भूदरगड विभाग, गारगोटी यांनी खातेदारांसमवेत बैठक घेतली असता खातेदारांनी भूसंपादनास तीव्र विरोध केला असून कोणतीही चर्चा होऊ दिली नाही.तद्नंतर संबंधित खातेदारांचा लेखी स्वरुपात होकार/नकार घेण्यात आला असता एकूण २७८ खातेदारांपैकी २१५ खातेदारांनी भूसंपादनास विरोध केला आहे.यास्तव भूसंपादनास संबंधित खातेदारांचा असलेला विरोध व सदर औद्योगिक क्षेत्र महामंडळास आर्थिकदृष्टया परवडणारे नसल्याने तसेच सामाईक सुविधा सुध्दा सहज उपलब्ध होवू शकणार नसल्यामुळे भूदरगड औद्योगिक क्षेत्र रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याअनुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खेड (जि.पुणे) तालुक्यातील सेझकरिता संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीला निश्चित करण्यात आल्यानुसार पॅकेज न दिल्याबाबत**

**(१२) * ६२४०८ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.पुणे) उद्योगाकरिता शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केल्यानंतर बाधित शेतकऱ्यास १५% विकसित जमिनीचा परतावा देण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेझ करिता संपादित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांना प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि. २६/१०/२००७ रोजी बैठकीनुसार निश्चित करण्यात आल्यानुसार पॅकेज न दिल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपनी आणि अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधींनी उद्योग मंत्री यांना दि.२१ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपनी आणि दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

-----------------

**राज्यातील जात वैधता प्रमाणपत्र तपासणी प्रक्रियेत असणा-या विद्यार्थ्यांना हमीपत्र घेऊन प्रवेश देण्याबाबत**

**(१३) * ६३३७६ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ज्या विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्र तपासणी प्रक्रियेत आहेत, त्यांच्याकडून त्याऐवजी हमीपत्र घ्यावे व अशा अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरिता प्रवेश अथवा स्कॉलरशिप नाकारू नये असे स्पष्ट आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाच्या आदेशाची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने अनेक विद्यार्थी परत न्यायालयात याचिका दाखल करत असल्यामुळे सरकार,

न्यायालय, विद्यार्थी व नागरिक यांचा वेळ वाया जातो असे दिनांक २६ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाची कोणती भूमिका आहे व अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) राज्यातील ज्या विद्यार्थ्यांची जात वैधता प्रमाणपत्र तपासणी प्रक्रियेत आहेत, त्यांच्याकडून त्याऐवजी हमीपत्र घेऊन उच्च शिक्षणाकरिता प्रवेश देण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिलेले आहेत.
(२) व (३) या विभागाच्या दि.२९/६/२०१६ च्या शासन निर्णयान्वये विभागीय जातीप्रमाणपत्र पडताळणी समितीने दि.३०/९/२०१६ पर्यंत मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जातीचे प्रमाणपत्र तपासून देण्यास मुदतवाढ दिली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## आंबेटेंबे (जि.ठाणे) येथील भिमाई स्मारकाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१४) * ६००५४ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देशात सर्वत्र डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती साजरी होत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आजोळ असलेले मुरबाडजवळील आंबेटेंबे (जि.ठाणे) येथील भिमाई स्मारक मात्र दुर्लक्षित असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने निधी उपलब्ध करुन देऊन सदर स्मारक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) व (२) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त त्यांच्या जीवनाशी निगडीत ऐतिहासिक स्थळांचा विकास करण्याचा निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या

दि. ९/१०/२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून, त्याअंतर्गत आंबेटेंबे ता.मुरबाड जि.ठाणे येथील भिमाई स्मारक विकसित करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**लोहारा, पांगरी व भोयर तालुका (जि. यवतमाळ) येथे औद्‍योगिक क्षेत्रासाठी संपादित केलेली जमीन शेतकऱ्यांस परत करणेबाबत**

**(१५) * ६१७१७ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **उद्‍योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोहारा, पांगरी व भोयर तालुका (जि. यवतमाळ) येथे औद्‍योगिक क्षेत्रासाठी संपादित केलेली नगर परिषद हद्दी जवळील व लोकवस्ती लगतची जमीन शेतकऱ्यांस परत करणे बाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास मा.उद्‍योगमंत्री यांना लेखी पत्राद्‍वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत मा. उद्‍योग मंत्री यांनी त्याच दिवशी उपमुख्य कार्यकारी अधिकारी -४ जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे सदर निवेदन कार्यवाहीकरिता पाठविले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी ६ मन्यांपासून कार्यवाही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) अतिरिक्त यवतमाळ औद्‍योगिक क्षेत्राकरिता मौजे लोहारा,भोयर व पांगरी येथील एकूण ४३९.८५ हे.आर जमिन संपादित करण्यात आली असून फेब्रुवारी/मार्च १९९८ मध्ये जमिनीचा ताबा महामंडळास प्राप्त झाला आहे. सन २००० मध्ये विकास कामांना सुरुवात करुन आजपर्यंत ८५.५८ हे.आर क्षेत्र विकसित करण्यात आले आहे.९५ हे.आर जागेवर १५९ भूखंडांचा आराखडा

विकसित करण्यात येत असून भूखंडाचे करारनामे करुन भूखंडाचा ताबा देण्याची कार्यवाही सुरु आहे.सद्य:स्थितीत एकूण ४४ भूखंडांवर उत्पादन सुरु असून १५ भूखंडांवर बांधकाम सुरु आहे. तसेच ९३ हे.आर जागेवर वस्त्रोद्योग झोन घोषित करण्यात आले आहे. यास्तव औद्योगिक विकासाची प्रक्रिया सुरु असल्याने अतिरिक्त यवतमाळ औद्योगिक क्षेत्राकरिता संपादित करण्यात आलेल्या मौजे लोहारा,भोयर व पांगरी येथील कोणत्याही जमिनी परत करणे शक्य होणार नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दापोली (जि.रत्नागिरी) येथील वाकवली-पिसई-माटवण प्र.जि.मा.१० या रस्त्याचे काम नाबार्ड अंतर्गत मंजूर करण्याबाबत**

**(१६) * ६१६४७ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोली (जि.रत्नागिरी) येथील वाकवली-पिसई-माटवण प्र.जि.मा.१० या रस्त्याचे काम नाबार्ड अंतर्गत मंजूर करण्याबाबत येथील स्थानिक लोकप्रतिनीधींनी दिनांक १४ जून, २०१६ रोजी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्राद्वारे विनंती केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामासाठी अंदाजे १ कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून हा रस्ता झाल्यास सर्वसामान्य ग्रामस्थ, शेतकरी यांना आवागमन अत्त्यंत सोईचे होईल हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय
(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्त्यामधील खराब लांबीतील मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भागातील सर्व शासकीय आश्रमशाळा या स्थानिक तालुका व जिल्हयाच्या ठिकाणी स्थापन करण्याबाबत

**(१७) * ६४१५५ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भागातील सर्व शासकीय आश्रमशाळा या स्थानिक तालुका व जिल्हयाच्या ठिकाणी स्थापन करण्याबाबत तसेच मुला-मुलींचे वसतीगृहे व सामाजिक सभागृहाची रचना करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री व मा.आदिवासी विकास मंत्र्यांना दिनांक १६ एप्रिल, २०१६ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच एमपीएससी व युपीएससीच्या पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आदिवासी उमेदवाराला देशातील नामांकित डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण संस्था, पुणे येथे प्रवेश मिळण्याबाबतही उक्त निवेदनात मागणी करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागण्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) खरे आहे.

(२) खरे नाही.

(३) व (४) मा. विधान सभा सदस्य यांच्या दिनांक १६.०४.२०१६ रोजीच्या निवेदनाच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास यांचे अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

-----------------

## राज्यातील शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहे यांची बांधकामे आणि देखभाल दुरुस्तीच्या कामाकरिता स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याच्या निर्णयाबाबत

**(१८) * ५५५०१ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासींसाठी असणाऱ्या विविध योजनांतून बांधण्यात येणारी घरकुले, शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहे यांच्या बांधकाम आणि देखभाल दुरुस्तीची कामे जलदगतीने व्हावीत तसेच बांधकामाचा योग्य दर्जा राखला जावा

यासाठी आदिवासी विभागांतर्गत स्वतंत्र कक्ष स्थापन करण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने दिनांक ३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कक्षासाठी एक मुख्य अभियंता, दोन अधिक्षक अभियंता यांच्यासह २१ पदांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या ११३.९० लाख रुपयांच्या खर्चास मान्यताही देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू योजना शासन किती कालावधीत पूर्ण करणार आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांच्या इमारतींची बांधकामे आणि देखभाल-दुरूस्तीची कामे करण्यासाठीच फक्त आदिवासी विकास विभागांतर्गत स्वतंत्र "बांधकाम व्यवस्थापन कक्ष" स्थापन करण्यास मंत्रीमंडळाच्या दि. ०३/०५/२०१६ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर योजनेनुसार बांधकाम कक्ष स्थापन करण्याचा निर्णय असून तो कायम स्वरुपी कार्यरत राहणार आहे.

-----------------

## भाईंदर येथील पेणकर पाडा येथे आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाचे बांधकाम सुरु करण्याबाबत

**(१९) * ५९९८८ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर येथील पेणकर पाड्यातील सुमारे दोन वर्षापूर्वी तत्कालिन आदिवासी मंत्र्यांनी भूमिपूजन केलेल्या चार हजार चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या जागेवरील आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाचे बांधकाम अद्यापही सुरु झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वसतिगृहाच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकाला मान्यता मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू वसतिगृहाच्या बांधकामासाठी मीरा-भाईंदर महापालिकेकडे रुपये २० कोटी ४० लाखांचा निधी आदिवासी विकास विभागाने हस्तांतरित करुनही अद्यापही बांधकामास सुरु न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,
(५) तसेच सदरहू वसतिगृहाचे बांधकाम कधीपर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

शासन निर्णय दिनांक २०.०८.२०१४ अन्वये मुळ अंदाजपत्रकास सन २०१३ - १४ च्या दरसुचीनुसार प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.
(३) मीरा-भाईंदर महानगरपालिकेकडे कोणताच निधी वर्ग करण्यांत आलेला नाही.
(४) महापालिकेने ३ वेळा निविदा जारी केली असता, मंजूर किंमतीपेक्षा सुमारे ३८ टक्के जादा दराने निविदा प्राप्त झाल्याने अद्ययावत दरसुचीच्या आधारे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. सबब विलंबाचा व चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) अद्ययावत अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्याता प्राप्त झाल्यावर विहित कार्यपध्दतीने बांधकाम सुरु होईल.

-----------------

## माढा तालुक्यातील (जि. सोलापूर) टेंभुर्णी ते बेंबळे या मार्गावरील पुलाचे काम सुरु झाले नसल्याबाबत

**(२०) * ६३६१२ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माढा (जि.सोलापूर) तालुक्यातील टेंभुर्णी ते बेंबळे प्रमुख जिल्हा मार्गावरील बेंबळे गावाजवळील पुलास माहे जुलै, २०१३ च्या दरम्यान निधी मिळूनही अद्याप पुलाचे काम सुरु झाले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच सदर पुलाचे काम करणेबाबत मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदयांना दिनांक २३ मे, २०१६ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींनी पत्र देऊन पुलाचे काम लवकर करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर पुलाचे काम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

प्रश्नांकित पूलाच्या कामास शासनाने दि.११/७/२०१३ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे रु.३ कोटी इतक्या रकमेस प्र.मा.प्रदान केली आहे. तथापि पूलाचा सर्वसाधारण मांडणी नकाशा तयार करण्यासाठी सखोल सर्वेक्षण केले असता पूलाची लांबी व उंची मोठया प्रमाणात वाढवणे आवश्यक असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे या पूलाच्या किंमतीत वाढ होवून ती सुमारे रु.१० कोटी इतकी होणे अपेक्षित आहे. या पूलाच्या सर्वसाधारण मांडणी नकाश्यास मान्यता प्रदान करुन कामाच्या सुधारीत अंदापत्रकास सुधारीत प्र.मा. प्राप्त करुन घेवून तद्नंतर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(२) नाही, असे निवेदन प्राप्त नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलडाणा जिल्हयातील पीक कर्ज वाटपाचे निर्धारीत उद्दीष्ट वाढविण्याबाबत

**(२१) * ६००३४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयात सन २०१६-१७ या वर्षासाठी पीक कर्जाचे रूपये १३५० कोटीचे उद्दीष्ट ठरविण्यात आले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातत्याने दुष्काळाची झळ सोसत असलेल्या बुलडाणा जिल्हयातील साडेसात लक्ष हेक्टर खरीप क्षेत्रासाठी सदर उद्दिष्ट निकषानुसार अपुरे असून अद्यापपर्यंत ७५ टक्के पिक कर्ज वाटप शिल्लक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदर उद्दीष्ट रु.२४०० कोटीपर्यंत वाढविणे बाबत तसेच उर्वरित पीक कर्ज त्वरीत वाटप करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) बुलढाणा जिल्हयामध्ये सन २०१६-१७ या कालावधीकरीता राष्ट्रीयकृत, व्यापारी व ग्रामीण बँकांमार्फत रु. १३६५.१६/- कोटी एवढे पिक कर्ज वाटपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे. त्यापैकी खरीप पिक कर्ज उद्दिष्ट रु. १२८१.५२ कोटी एवढे असून रब्बी पीक कर्ज वाटप उद्दिष्ट रु. ८३.६४ कोटी एवढे आहे.

(२) बुलढाणा जिल्हयामध्ये खरीप पीक कर्ज वाटप उद्दिष्ट रु. १२८१.५२ कोटी पैकी दि. १५ जुलै, २०१६ अखेरपर्यंत १२८१५२ एवढया सभासदांना रु. ७८५.१२ कोटी एवढे खरीप पिक कर्ज वाटप करण्यात आलेले आहे व सदरची उद्दिष्ट पुर्तता एकूण खरीप लक्षांकच्या ५९ टक्के एवढे आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) पिक कर्ज वाटपाचे वार्षिक उद्दिष्ट राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) तसेच राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या मान्यतेने निश्चित करण्यात आले असून बुलढाणा जिल्हयामध्ये जास्तीत जास्त पीक कर्ज वाटप उद्दिष्टपुर्ती करण्यासाठी जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक आठवडयाला जिल्हास्तरीय बँकर्स समितीची सभा आयोजित करुन पीक कर्ज वाटपाचा आढावा घेण्यात येतो व जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांना कर्ज वाटप करणेबाबत जिल्हाधिकारी यांचे मार्फत कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई अंतर्गत खुल्या निविदांमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२२) * ६२८७५ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम मंडळ मुंबई अंतर्गत इलाखा शहर विभाग (सा.बां.) मुंबई येथे तीन लाखांपेक्षा कमी किंमतीच्या खुल्या निविदांमध्ये कार्यकारी अभियंता श्री.हांडे, अधिक्षक अभियंता, श्री.अतुल चव्हाण, वरिष्ठ लेखा अधिकारी, श्री.जाधव व उपविभागीय अधिकारी, श्री.एच.पी.सावंत यांनी संगनमत करुन गैरव्यवहार केल्याचे सन २०१६ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ३ लाखापेक्षा जास्त किंमतीच्या कामाचे ई-निविदा प्रणालीद्वारे कामाचे वाटप करण्याचा दिनांक २६ नोव्हेंबर, २०१४ रोजी अध्यादेश काढलेला असतानाही या अधिकाऱ्यांनी सदर कामे न करता फक्त कागदोपत्री कामे दाखवून गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) तदनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) प्रश्नात नमूद विषयाबाबत तक्रार प्राप्त झाली असून, सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

-----------------

## जव्हार, मोखाडा व विक्रमगड (जि.पालघर) येथील आश्रमशाळांची दुरुस्ती व नवीन खोल्यांच्या बांधणीबाबत

**(२३) * ६००४३ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार, मोखाडा व विक्रमगड (जि.पालघर) येथील जव्हार आश्रमशाळा प्रकल्पांतर्गत चालविल्या जाणा-या ३० आश्रमशाळांत एकूण १८ हजार ६८७ विद्यार्थी शिक्षण घेत असून उक्त आश्रमशाळांची दुरावस्था झाली असून अनेक आश्रमशाळांना खोल्यांची कमतरता तसेच विद्यार्थ्यांना स्वच्छतागृहे उपलब्ध नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर व शैक्षणिक कार्यावर परिणाम होत असून सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीत काय निष्पन्न झाले

(३) असल्यास, त्यानुसार आश्रमशाळांची दुरुस्ती व नवीन खोल्यांची बांधणी करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

जव्हार प्रकल्पांतर्गत ३० शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून सदर शाळांमध्ये सन २०१६-१७ मध्ये ८८९७ मुले व ८८६८ मुली असे एकूण १६५६५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सदर आश्रमशाळांमध्ये मुलांसाठी १७८ व मुलींसाठी १८२ स्नानगृहे तसेच मुलांसाठी १९८ व मुलींसाठी २६२ शौचालये उपलब्ध आहेत. तसेच विद्यार्थ्यांची गैरसोय होवू नये यासाठी आश्रमशाळांच्या दुरूस्तीची कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरू आहे. तसेच २१ आश्रम शाळांसाठी नविन टाईप प्लॅननुसार ईमारत बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून दाभोसा, न्याहाळे, भोपोली, हिरवे व गोंदे या ५ आश्रमशाळांच्या इमारतींचे बांधकाम पुर्ण होवून सदर इमारती आदिवासी विकास विभागास हस्तांतरीत करून घेण्यात आलेल्या आहेत. तसेच दाभेरी, विनवळ, साखरे, कुर्झे, देहरे व कावळे या ६ आश्रमशाळांचे बांधकाम पुर्णत्वाच्या मार्गावर असून गुहिर, गारगाव, सुर्यमाळ, पाली व पळसुंडा या ५ आश्रमशाळांचे इमारत बांधकाम प्रगतीपथावर आहे.

तसेच प्रकल्प अधिकारी, जव्हार कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या शासकीय आश्रमशाळा दुरूस्ती व बांधकामाच्या कामांना जिल्हाधिकारी, पालघर यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून सद्यस्थितीत दुरूस्तीबाबतची कामे प्रगतीत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरात बांधलेल्या ३१ उड्डाणपुलांवरील देखभालीचा खर्च एमएसआरडीसीमार्फत केला जात असल्याबाबत

**(२४) * ५७९५६ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएसआरडीसीने १०५८ कोटी ३४ लाख ६६ हजार इतका खर्च करुन मुंबई शहरात बांधलेल्या ३१ उड्डाणपुलांचा खर्च सन २०१० पूर्वी एमएसआरडीसीकडून ५ टोल नाक्यांवरुन वसुल केला जात असल्याची बाब माहिती अधिकारात श्री.अनिल गलगली यांना मिळाल्याची बाब उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१०-११ पासून दिनांक १९ नोव्हेंबर, २०१६ पर्यंत एमईपी या कंपनीला टोल वसुलीचे कंत्राट देण्यात आल्यामुळे एमएसआरडीसीने एमईपीकडून २२४२.३५ कोटी रुपये एक रकमी घेतल्याचे उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या उड्डाणपुलावरील देखभालीचा खर्च हा टोल वसुल करणाऱ्या एमईपी कंपनीकडून केला जात नसून, या सहा वर्षाच्या काळात एमएसआरडीसीने उड्डाणपुलांच्या देखभालीसाठी ३४ ते ३५ कोटी रुपये खर्च केले आहे, हे खरे आहे काय, असल्यास, या ३१ उड्डाणपुलाच्या निर्मितीपासून देखभालीपर्यंत आतापर्यंत एमएसआरडीसीने केलेला खर्च किती तसेच एमएसआरडीसी व एमईपी कंपनीकडून टोल मार्फत वसुल करण्यात आलेली रक्कम किती आहे,

(४) असल्यास, हे सर्व ३१ उड्डाणपुल सन २००० पूर्वीचे बांधण्यात आले असून, त्यांच्या बांधकामाचा खर्च शासनाच्या निधीतून झाला असूनही एमईपी कंपनीकडून टोल वसुल करण्याची कारणे काय आहेत,

(५) तसेच सन २०१०-११ मध्ये एमईपी कंपनीला पाचही टोल नाक्यांवरील टोल वसुलीचे कंत्राट देताना त्या कंपनी बरोबर एमएसआरडीसीने केलेल्या करारात नमूद करण्यात आलेल्या प्रमुख अटी कोणत्या, त्या अटींचे पालन कंपनी करत नसतानाही या कंपनीला टोल वसुली करण्याबाबत अनुमती देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(६) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार पुढे दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई, उपनगरे, ठाणे व नवी मुंबई परिसरात बांधावयाच्या ५५ उड्डाणपुलांपैकी महामंडळामार्फत खर्च करण्यात आलेल्या ३१ उड्डाणपुल, १ रेल्वे अंडरब्रिज, १ रेल्वे ओव्हर ब्रिज, २ खाडीपूल, ४ पादचारी मार्ग, ४ जंक्शन, १ अंडरपास व ५ पथकर नाके व इतर प्रगतीतील कामांवर एकूण रू. १२५८.९९ कोटी इतका खर्च झालेला आहे.

(२) नाही.

मे.एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.या कंपनीला दि.२०.११.२०१० ते १९.११.२०२६ (१६ वर्षांकरीता) पर्यंत २७ उड्डाणपुले व अनुषंगिक बांधकामे यांची देखभाल व

दुरूस्तीसह पथकर वसुलीचे कंत्राट रू.२१०० कोटी एक रकमी आगाऊ घेऊन देण्यात आले आहे.

(३) नाही.

निविदा स्वीकृती पासून २७ उडडणपूलांची देखभाल दुरूस्ती मे.एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. कंपनीमार्फत निवीदेतील अटी व शर्तीप्रमाणे करण्यात येत आहे.

सन १९९९ पासून दि. २०.११.२०१० पर्यंत महामंडळामार्फत बांधण्यात आलेल्या उडडाणपूलांवर देखभाल व दुरुस्तीकरीता रु ८७.२८ कोटी इतकी रक्कम महामंडळाने खर्च केलेली आहे. मे.एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी त्याच्याकडे सोपविलेल्या उड्डाणपुलांवर मार्च २०१५ पर्यंत १५६.०३ कोटी खर्च केला आहे. मे.एमईपी च्या निवीदेत समाविष्ट नसलेल्या ६ उड्डाणपुलांच्या देखभालदुरूस्ती साठी महामंडळाने २०१० पासून आजतागायत रु.३०.४७ कोटी खर्च केले आहेत. पथकरातून महामंडळास मे.एमईपी कडून प्राप्त रु.२१०० कोटी धरुन रू.३१६९.२८ कोटी प्राप्त आहेत. मे.एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांनी नोंव्हेबर २०१० ते जून २०१६ अखेरपर्यंत रु.१७११.४६ कोटी इतका पथकर गोळा केला आहे.

(४) महामंडळाने उड्डाणपुलांचा खर्च कर्जरोखे काढून केलेला आहे.

(५) व (६) मे.एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांसोबत केलेल्या करारानुसार कंत्राटदाराने पाच पथकर नाक्यांवर शासन अधिसूचनेप्रमाणे पथकर वसुली करावयाची आहे. तसेच मुंबई उपनगरे, नवी मुंबई, ठाणे परिसरातील २७ उड्डाणपुले, ४ पादचारी मार्ग, १ रेल्वे ओव्हर ब्रीज व १ रेल्वे अंडर ब्रीज यांची देखभाल व दुरूस्ती करावयाची आहे. निविदेतील तरतूदीनुसार स्वतंत्र अभियंत्याच्या देखरेखीखाली देखभाल दुरूस्तीचे काम करण्यात येत आहे.

-----------------

## जळगाव शहरातील खेडी येथील नवीन आदिवासी वसतिगृहातील विविध समस्यांबाबत

**(२५) * ६४४०० श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहरातील खेडी येथील नवीन आदिवासी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण, जेवण वेळेवर न मिळणे, पिण्यास व आंघोळीस पाणी

मिळत नसणे, दुर्गंधीयुक्त शौचालये इत्यादी समस्यांमुळे गैरसोय होत असून सदर आदिवासी विद्यार्थ्यांनी आंदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वसतिगृहाची शासनाने पाहणी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, सदर आदिवासी विद्यार्थ्यांना सुविधा न देणाऱ्या गृहपालांची शासन चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करणार आहे काय तसेच जेवणाचे कंत्राट बदलण्याकरिता तसेच आदिवासी विद्यार्थ्यांना आवश्यक सोयीसुविधा पुरविण्याकरिता शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक १२ फेब्रुवारी, २०१६ रोजी वसतीगृहातील पाणी पुरवठा व भोजना संदर्भाच्या समस्यांबाबत विद्यार्थ्यांनी आंदोलन केले होते.
(२) सदर आंदोलनाच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, यावल यांनी सदर वसतीगृहास भेट दिली होती. भेटीदरम्यान भोजनठेकेदार बदलून देण्याबाबत तसेच पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत विद्यार्थ्यांनी मागणी केली होती.
(३) सदर वसतीगृहाचा भोजन ठेकेदार बदलण्यात आला असून नवीन भोजन ठेकेदाराकडून नियमित व दर्जेदार आहार पुरविण्यात येत आहे. तसेच वसतीगृहास पाणीपुरवठा करणाऱ्या मोटारीची दुरूस्ती करून अधिक दाबाने पाणीपुरवठा करण्यात येत आहे व सदर आंदोलनाची दखल घेऊन वसतीगृह गृहपालांची इतरत्र प्रतिनियुक्तीवर तात्काळ बदली करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मावळ (जि.पुणे) तालुक्यातील सांगवडे- गहुंजे गावांना जोडणारा लोखंडी पूल धोकादायक झाल्याबाबत

**(२६) * ६४४३८ श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मावळ तालुक्यातील (जि.पुणे) सांगवडे- गहुंजे गावांना जोडणारा लोखंडी पूल धोकादायक झाला असून अनेकांना जीव मुठीत घेऊन या पुलावरून ये-जा करावी लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगवडे, दारूब्रे, कासारसाई येथील ग्रामस्थांना व विद्यार्थ्यांना याच पुलावरून ये जा करावी लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अरुंद लोखंडी पूलावरून एकेरी वाहतूक चालू आहे तसेच पुलाला भेगा पडल्या आहेत त्यामुळे पूल वाहतुकीस अत्यंत धोकादायक झाला आहे, त्यामुळे येथे कायमस्वरूपी मोठा पूल व्हावा अशी मागणी ग्रामस्थ करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हा पूल लवकर होणेबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे काय , नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) पुल वाहतुकीस धोकादायक झालेला आहे, हे खरे आहे.
(२) ते (३) होय, हे खरे आहे.
(४) जिल्हा नियोजन समितीकडून उपलब्ध होणारा निधी व प्राथम्य क्रमानुसार, पवना नदीवरील सांगवडे-गहुंजे गावांना जोडणा-या पुलाचे बांधकाम करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन राहिल.

-----------------

## दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मांगेली, तळेवाडी, सडा या रस्त्यांचे मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याबाबत

**(२७) * ५४९०७ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडामार्ग (जि.सिंधुदुर्ग) तालुक्यातील मांगेली, तळेवाडी, सडा या सुमारे दीड किमी अंतराच्या रस्त्याचे मजबूतीकरण, खडीकरण व डांबरीकरण करण्याची तसेच मांगेली-तळेवाडी ते कर्नाटक सडा ते चोर्ला मुख्य रस्ता तयार करण्याबाबत त्या परिसरातील ग्रामस्थांनी मागील ३ वर्षापासून सातत्याने मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी, अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, रत्नागिरी, प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग(रस्ते) मंत्रालय, मुंबई आदींकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच कर्नाटक सीमेवर व महाराष्ट्राचे शेवटचे टोक असलेल्या मांगेली-तळेवाडी ते कर्नाटक सडा ते चोर्ला मुख्य रस्ता तातडीने पूर्ण केल्यास बेळगाव,

दोडामार्ग कमी अंतराने जोडले जाणार असून सध्या दोडामार्ग तालुकावासियांना बेळगाव, कोल्हापूराकडे जाण्यासाठी धोकादायक तिलारी घाटाचा आधार घ्यावा लागत आहे व हा घाट वाहतूकीस अयोग्य आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्या परिसरातील जनतेच्या सातत्याच्या मागणीनुषंगाने सर्वच दृष्टीने फायदेशीर व पर्यटनाच्या दृष्टीने योग्य असलेल्या सदरहू रस्त्याचे काम विनाविलंब हाती घेवून तो लवकर कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाचे धोरण काय राहणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.
(३) सदरहू रस्त्याचे काम मंजूर असून निविदास्तरावर आहे. पावसाळा संपल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

### औरंगाबाद-पैठण या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(२८) * ६४५६२ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद-पैठण या ५३ किमी च्या रस्त्याची दुरावस्था झाली असून मागील अनेक वर्षापासून या रस्त्याची दुरुस्ती करावी अशी मागणी नागरिक करीत असुनही याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पैठण हे पर्यटनासाठीही प्रसिध्द असुन पैठण येथे येणारे अनेक भाविक, पर्यटक तसेच बिडकीन एमआयडीसीकडे जाणाऱ्यांची संख्या मोठी असून हे सर्व उक्त रस्त्याचा वापर करतात परंतू या रस्त्याची दुरावस्था झाल्याने त्यांची गैरसोय होत आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नागरिकांनी रस्त्याच्या दुरूस्तीची मागणी केलेली आहे हे खरे आहे. तथापी रस्त्याची दुरूस्ती करीत नसल्याची बाब खरी नाही.
(२) क्षतिग्रस्त लांबीतील खड्डे किरकोळ दुरूस्ती अंतर्गत दुरूस्त करून रस्ता वाहतुकीसाठी योग्य ठेवण्यात येत आहे.

(३) क्षतिग्रस्त लांबीत नुतनीकरण व सुधारणा करण्याचे काम मंजुर असुन ऑगस्ट, २०१६ अखेर निविदा निश्चितीकरण करून उपलब्ध निधीच्या अधिन राहुन काम पुर्ण करण्यात येईल.

----------------

**राज्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये हजारो आदिवासी बालकांचे मृत्यु झाल्याबाबत**

**(२९) * ५६१७७ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी शासकीय आश्रमशाळांमध्ये मागील काळात सुमारे १०७७ आदिवासी बालकांचा मृत्यु झालेला असल्याची माहिती मे, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात उघडकीस आलेले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याबाबत लवकर निर्णय घेऊन आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. विष्णु सवरा :** (१), (२) व (३) शासनाने आदिवासी विद्यार्थ्यांच्या मृत्यु प्रकरणाचा आढावा घेतला होता सदर आढाव्या दरम्यान सन २००१ ते सन २०१५ या १५ वर्षाच्या कालावधीत राज्यात १०७७ शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थी/विद्यार्थीनींचा विविध कारणांमुळे मृत्यु झाल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मागील दोन वर्षात झालेल्या मृत्यु कारणांचा अभ्यास श्री. सुभाष साळुंखे, सेवानिवृत्त महासंचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य यांना करण्याची विनंती डिसेंबर, २०१५ मध्ये केली होती. त्यानुसार त्यांनी

अभ्यास करून शासनास दि.१३/४/२०१६ रोजी सादरीकरण केले. त्यांच्या सूचनेनुसार शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मृत्युच्या कारणांचा अभ्यास करून सदर मृत्यु रोखण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी आदिवासी विकास विभागाच्या दि. ३० मे, २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये तांत्रिक समिती स्थापन करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी (१) सर्व आश्रमशाळांमध्ये चांगले पिण्यायोग्य पाणी उपलब्ध करणे, शौचालय व स्नानगृहांची सुविधा पुरविण्यासाठी वॉश कार्यक्रम राबविण्यात येत आहे. (२) आश्रमशाळांमध्ये व्यवस्थापन सुधारण्यासाठी शाळा व्यवस्थापन समित्यांची स्थापना करून त्यांना किरकोळ दुरूस्तीसाठी रू. १ लक्ष निधीचे अधिकार देण्यात आले आहेत. (३) आश्रमशाळांना कंपाउन्ड वॉल बांधण्यात येत आहे. (४) आश्रमशाळांची बांधकामे गतीने होण्यासाठी स्वतंत्र बांधकाम कक्ष स्थापन करण्यात येत आहे. (५) TISS च्या अहवालानुसार गट क व ड वर्गातील शाळांना नोटीस देवून सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## कात्रज, पुणे येथील जुन्या बोगद्यातील रस्त्यांची दुरावस्था झाल्याबाबत

**(३०) * ५४१०४ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कात्रज, पुणे येथील जुन्या बोगद्यात जागोजागी तुटलेले संरक्षक कठडे, अंतर्गत रस्त्यांची दुरावस्था यामुळे कात्रजच्या जुन्या बोगद्याची दुरुस्ती करणे आवश्यक झाले असल्याचे माहे जून, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कारणांमुळे बोगद्यातील प्रवास असुरक्षित झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने पाहणी केली आहे काय, असल्यास त्यानुषंगाने शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नाही. हे खरे नाही.

प्रश्नाकिंत बोगदा हा कात्रज शिंदेवाडी विशेष राज्यमार्ग क्र.१२२/१ वर आहे. बोगदयामध्ये कठडे नाहीत. बोगदयातील रस्ता व बोगदा पूर्णपणे सुस्थितीत आहे. बोगदयातून व रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**दिघी गाव (जि.रायगड) येथील जंजिरा - मुरूड या अलिबाग व श्रीवर्धन तालुक्यांना जोडणाऱ्या पुलाचे बांधकामाबाबत**

**(३१) * ६३४६३ श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील दिघी गाव व जंजिरा-मुरूड या दोन तालुक्यामध्ये जलमार्गाने वाहतूक सुरू असून ते रस्तेमार्गाने जोडण्यासाठी पुलाचे बांधकाम करावे अशी मागणी सातत्याने लोकप्रतिनिधी व स्थानिक जनतेने शासनाकडे केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहतुकीसाठी वेळ व पैसा या दोहोंची बचत करणाऱ्या व स्थानिकांना सोयीच्या ठरणाऱ्या या पुलाच्या बांधकामासाठी बराच कालावधी लागला असून यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, जनतेची दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) व (३) विषयांकित पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## भिवंडीजवळील चिंचोटी-अंजूरफाटा ते माणकोली रस्ता रुंदीकरणाची कामे अपूर्ण असूनही अवैधपणे टोलवसूली होत असल्याबाबत

**(३२) * ६३१९० श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) येथील चिंचोटी-अंजूरफाटा ते माणकोली रस्ता रुंदीकरणाची कामे सन २००९ मध्ये मे. सुप्रीम कंपनीला देण्यात येऊनही सदर रस्ता रुंदीकरणाच्या कामाची मुदत २ वर्ष ६ महिन्यांत पूर्ण होणे आवश्यक असतानाही अद्यापही पुर्ण झालेली नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता रुंदीकरणाची कामे मे. सुप्रीम कंपनीने पूर्ण न करता व निकृष्ट बांधकाम करुनही गेल्या चार वर्षांपासून मालोडी येथे अवैधपणे व शासनाची कोणतीही परवानगी न घेता संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिका-यांशी संगनमत करुन टोलवसूली सुरु केल्याबाबतच्या तक्रारी स्थानिक नागरिकांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे केल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार रस्ता रुंदीकरणाची कामे विहित वेळेत पूर्ण न करता अवैधपणे टोलवसूली करणाऱ्या मे. सुप्रीम कंपनीवर व सदरहू प्रकरणी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंता व इतर अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व सदरहू प्रकरणाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) याबाबत अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ यांना सदर कामाची तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती जिल्ह्यातील पाथरगांव (ता.चांदूर रेल्वे) येथे सेवाभवन (समाजमंदिर) बांधण्याबाबत**

**(३३) * ६२३६३ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील पाथरगांव (ता.चांदूर रेल्वे) येथील स्थानिक नागरीकांच्या मागणीनुसार सेवा भवन (समाज मंदीर) बांधण्याचा प्रस्ताव स्थानिक लोकप्रतिनिधींनी रु.१० लक्ष अनुदान मागणीचा प्रस्ताव माहे ८ जून, २०१६ रोजी वा त्या सुमारास सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, अमरावती येथे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील सेवाभवन (समाजमंदिर) बांधण्यास तातडीने निधी मंजूर करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय.

(२) पाथरगांव, ता.चांदूररेल्वे, जि.अमरावती येथील तांडयास सन २०१५ मध्ये रु.४ लक्ष रस्ता व नाली बांधकाम करण्यास मंजूर करण्यात आले आहेत. परंतु स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ८/६/२०१६ च्या निवेदनाद्वारे केलेल्या मागणीनुसार मंजूर करण्यात आलेल्या निधीतून सदर तांडयास रस्ता व नाली बांधकामाऐवजी सेवाभवन (समाजमंदिर) बांधकाम करण्यास मंजूरी देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चोपडा (जि.जळगांव) येथील नविन प्रशासकीय बांधकामास मंजूरी देऊनही बांधकाम अपूर्ण असल्याबाबत**

**(३४) * ६२७२९ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चोपडा येथे (जि.जळगांव) नविन प्रशासकीय बांधकामास सन २०१२ मध्ये प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीचे बांधकाम अदयापही अपूर्ण असून शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, या इमारतीच्या बांधकामास माहे जून, २०१६ अखेर किती निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे व अद्याप किती निधीची आवश्यकता आहे तसेच ही इमारत बांधून पूर्ण होण्यास किती कालावधी लागणार आहे,

(४) तसेच या इमारतीच्या बांधकामास विलंब लागण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) चोपडा (जि.जळगांव) येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीचे बांधकामास सन २००९ मध्ये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि सदर कामासाठी जागा दि.२०/११/२०१२ रोजी उपलब्ध झालेली आहे.

(२) सदर इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. चौकशी केलेली नाही.

(३) सदर इमारतीच्या बांधकामास सन २०१६-१७ साठी माहे जून, २०१६ अखेर रू.९४.१८ लक्ष एवढा निधी उपलब्ध असून कामावर माहे मार्च, २०१६ अखेर रू.३१.६८ लक्ष खर्च झाला आहे. काम पूर्ण करण्यास अद्याप रू.२५९.१२ लक्ष निधीची आवश्यकता आहे. आवश्यक असणारा निधी उपलब्ध झाल्यास सदर बांधकाम पूर्ण करण्यास १२ महिने कालावधी अपेक्षित आहे.

(४) सदर कामासाठी जागा उपलब्ध करून देण्यास लागलेला विलंब तसेच सदर कामासाठी सन २०११-१२ ते २०१३-१४ पर्यंत उपलब्ध तरतूद निरंक, पुढील वर्षातसूद्धा कमी तरतूद उपलब्धतेमुळे या इमारतीच्या बांधकामास विलंब झालेला आहे.

-----------------

## वांद्रे येथील शासकीय वसाहतीची व रस्त्याची झालेली दुरावस्था

**(३५) * ६२१३६ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे येथील शासकीय वसाहतीत अनधिकृत गाळे व दुकानांची संख्या वाढत असून विशेषत: इमारत क्रमांक - ६ समोरील फुटपाथवर इमारत क्रमांक - ३६, तसेच सिनेमॅक्स समोरील इमारत क्रमांक जवळील फुटपाथवर देखील अनधिकृत बांधकामे, शेड उभारुन दुकाने सुरु करण्यात आली आहेत. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत दुकाने व गाळे उभारताना संबंधितांना कोणी परवानगी दिली, तसेच सदर अनधिकृत दुकाने, गाळ्यांची सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांनी पहाणी केली आहे काय,

(३) तसेच, सदर वसाहतीतील इमारत क्रमांक २१२ ते २२१ या इमारतीच्या परिसरातील चौकाची व रस्त्याची दुरावस्था झाली असून या परिसरात अस्वच्छता असल्याचे माहे एप्रिल, २०१६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) तसेच इमारत क्रमांक १४१ व १४२ च्या मागील बाजूस पाण्याचा निचरा होण्याची सुविधा नसल्याने अल्पशा पावसाने पाणी साठून राहते, सतत साठलेले पाणी, कचराकुंडी, इतरत्र पसरलेला कचरा, उघडी ड्रेनेज लाईन इत्यादीमुळे परिसरात दुर्गंधी व घाणीचे साम्राज्य पसरले असून डासांचाही प्रादूर्भाव वाढला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त अनधिकृत बांधकामे दुकाने, शेडस् निष्कासित करण्याबाबत इमारत क्र. २१२ ते २२१ व रस्त्याची दुरावस्था दुर करण्याबाबत तसेच इमारत क्र. १४१ जवळील कचराकुंडी कायमस्वरुपी हटवून परिसरातील अस्वच्छता दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे,

शासकीय वसाहतीमधील मुख्य रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती तसेच रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या फुटपाथवरील अतिक्रमित गाळे निस्कासित करण्याचे काम मुंबई महानगर पालिकेमार्फत करण्यात येते. कंपाऊंडच्या आतील अनधिकृत गाळयाबाबत सा. बां. विभागामार्फत कार्यवाही करण्यात येते.

(२) सा. बां. विभागाच्या हद्दीतील सदर अनधिकृत दुकाने व गाळे उभारताना संबंधितांना परवानगी देण्यात आलेली नाही तसेच सदर अनधिकृत दुकाने, गाळयांची सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिका-यांनी पाहणी केली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे,

तथापि, इमारत क्र.२१२ ते २२१ या इमारतीच्या परिसरातील मुख्य रस्त्याचे काम महानगरपालिकेमार्फत पुर्ण करण्यात आले आहे.

इमारत क्र.२१२ ते २२१ या इमारतीच्या चौकाची स्वच्छता व दुरूस्ती सा.बां. विभागामार्फत करण्यात आली आहे.

(४) हे खरे नाही.

(५) सदर शासकीय वसाहतीतील सा. बां. विभागाच्या हददीतील नव्याने आढळून आलेले अनधिकृत गाळे व दुकाने हटविण्याबाबत वेळोवळी कार्यवाही करण्यात आलेली आहे व असे प्रकार निदर्शनास आल्यास तातडीने निष्कासनाची कार्यवाही करण्यात येते. इमारत क्र.२१२ ते २२१ या इमारतीच्या परिसरातील रस्त्याचे काम महानगरपालिकेमार्फत पुर्ण करण्यात आले आहे. इमारत क्र. १४१ जवळील कचराकुंडी हटविण्याची कार्यवाही बृहन्मुंबई महापालिकेकडून अपेक्षित आहे.

-----------------

**आदिवासी विकास विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना/सवलतींचा लाभ अपंग व्यक्ती/ अपंगाच्या संस्था यांना मिळणेबाबत**

**(३६) * ६४५०२ श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभाग निर्णय क्र.रोस्वरो-१२०२/प्र.क्र. ६४ (२००२)/का-१२ मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ नुसार आदिवासी समाजाला मिळणाऱ्या सवलतींमध्ये अपंग व्यक्तींना व त्यांच्या संस्थांना समाविष्ट करण्याची मागणी लोकप्रतिनिधीनी दि. २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी आदिवासी विकास मंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर महाराष्ट्र शासनाने उपसचिव यांनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक आणि व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांना लेखी पत्र पाठवून आदिवासींच्या कोणत्या सवलतीचा लाभ अपंग/अपंग संस्था यांना देण्यात येईल अशी विचारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) उद्योग उर्जा व कामगार विभागामार्फत दि.३०.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्व शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्यात आलेले आहे. सबब, या शासन निर्णयातील मुद्या क्र.२.५ अन्वये या विभागाचा विषयांकित शासन निर्णय

क्र.रोस्वरो-१२०२/प्र.क्र.६४(२००२)/का-१२, दिनांक १२ फेब्रुवारी, २००४ अधिक्रमीत झालेला आहे.

तथापि, दि.३०.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयामधील खरेदी नियमावलीतील ५.१४ येथील तरतुदींनुसार अंध व अपंग संस्थांकडून करावयाच्या खरेदीबाबत या विभागामार्फत कार्यवाही करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत विभागामार्फत अपंग व्यक्तींना खालील लाभ / सवलती देण्यात येतात :-

- विभागाच्या भरती प्रक्रीयेत अपंग व्यक्तींकरिता ३% आरक्षण ठेवण्यात येते.
- सामाजिक न्याय विभागाकडून या विभागाकडे हस्तांतरीत झालेल्या वसतीगृहांमध्ये अंध व अपंग विद्यार्थ्यांना प्रवेशामध्ये ३% आरक्षण ठेवण्यात आलेले आहे.
- शासकीय तसेच अनुदानित आश्रमशाळांमध्ये अपंग विद्यार्थ्यांना प्रत्येक वर्गात प्रवेशाकरिता ३% आरक्षण देण्याबाबत तरतूद केली आहे.
- इ. ८ ते इ.१२ वी मधील अनुसूचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना दरमहा रू.१०० प्रवास भत्ता व रू.५०० इतकी शिष्यवृत्ती देण्यात येते.
- शबरी घरकुल योजनेंतर्गत ४०% अपंगत्व असलेल्या लाभार्थ्यांना दारीद्र रेषेबाबत (BPL) अटीचा निकष शिथील केला आहे.

याशिवाय या विभागाच्या इतर वैयक्तिक लाभाच्या योजनेंतर्गत आदिवासी अपंग व्यक्तींना प्राधान्य देण्याबाबत प्रस्ताव विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्हयातील खेड-आंबिवली-नांदिवली प्र.जि.मा. या मार्गावरील पुलाचे बांधकाम करणेबाबत

**(३७) * ६१६४९ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील खेड-आंबिवली-नांदिवली प्र.जि.मा. या मार्गावरील पुलाचे बांधकाम करणे अत्यंत गरजेचे असून हा पुल झाल्यास शेतकरी व ग्रामस्थांना आवागमन करणे अत्यंत सोईचे होईल, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलाचे नाबार्ड अंतर्गत काम मंजूर होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक १४ जून, २०१६ रोजी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना पत्राद्वारे विनंती केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामासाठी अंदाजे २.५० कोटी रुपयांच्या निधीची आवश्यकता असून शासनाने याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.
(३) व (४) विषयांकित पूलाचे पूर्नबांधणी करण्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

### अकोले (जि. अहमदनगर) पंचायत समितीच्या घरकुल योजनेबाबत

**(३८) * ६१३३८ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले (जि.अहमदनगर) पंचायत समितीच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या अनास्थेमुळे दारिद्रय रेषेखालील कुटुंबासाठी असलेल्या घरकुल योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊ न शकल्याने त्यासाठी आलेला सुमारे ८ कोटीचा निधी परत गेल्याची माहिती दिनांक २५ एप्रिल, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) नाही.

केंद्र शासनाने दिलेल्या निर्देशानुसार इंदिरा आवास योजनेंतर्गत असलेला अखर्चित निधी राज्य शासनाकडे परत गेला नसून "राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण" यांचेकडील राज्य स्तरावरील बँक खात्यात जमा करण्यात आला आहे.

सन २०१५-१६ पासून PFMS प्रणालीद्वारे राज्यस्तरीय बँक खात्यातून लाभार्थ्यांच्या बँक / पोस्ट खात्यात निधीचे थेट वितरण करण्यात येणार आहे.

तसेच, सन २०१५-१६ पूर्वीच्या घरकुलांना NEFT / RTGS द्वारे राज्यस्तरीय बँक खात्यातून लाभार्थ्यांच्या बँक / पोस्ट खात्यात निधीचे थेट वितरण करण्यात येणार आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माढा तालुक्यातील (जि.सोलापूर) पिंपळनेर ते पुणे-सोलापूर या राष्ट्रीय महामार्गाला जोडणा-या पिंपळनेरमधील रस्त्याची झालेली दुरावस्था**

**(३९) * ६३६४७ श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माढा तालुक्यातील (जि.सोलापूर) पुणे-सोलापूर महामार्गाला जोडणा-या पिंपळनेर मधील रस्त्याची व ज्योतिर्लिंग मंदिर ते रोहिदास नगर या रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माढा मतदार संघातील रस्त्यांच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतीनिधीनी दिनांक २३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच प्रश्न भाग १ मधील रस्त्याची शासनामार्फत पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत व तदनुसार सदर रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) असे निवेदन प्राप्त झालेले नाही.

(३), (४) व (५) प्रश्नांकित रस्ता हा एकूण ६.५०० कि.मी. लांबीचा आहे. या लांबीपैकी सुरुवातीची १.३०० कि.मी.लांबी प्रजिमा १०५ चा भाग असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित व उर्वरित ५.२० कि.मी. लांबी ग्रामीण मार्ग ३१ चा भाग असून जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या ताब्यात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यातील लांबी व ग्रामविकास विभागाच्या अखत्यारितील ही खड्डे डांबरमिश्रित खडीने भरुन वाहतूकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आली आहे. या रस्त्यासाठी मजबूतीकरिता व डांबरीकरणाची काही कामे करणे आवश्यक आहे. सदर कामे मंजूरी, निधी, निकष व प्राधान्य क्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## दोडामार्ग-तिलारी (जि.सिंधुदुर्ग) या रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणाच्या प्रलंबित कामाबाबत

**(४०) * ५४७६४ श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दोडामार्ग-तिलारी (जि.सिंधुदुर्ग) हा सुमारे १२ किमी अंतराचा रस्ता अत्यंत खराब झाल्याने मागील ७ वर्षात अपघात होवून अनेकांचा प्राण गेला व कित्येक जण गंभीररित्या जखमी होण्याच्या घटना घडल्यामुळे रस्त्यासाठी प्रखर आंदोलने करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनतेच्या मागणीमुळे सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षात सदरहू रस्त्यांच्या नूतनीकरणासाठी साडेसहा कोटींची आर्थिक तरतूद झाल्यानंतर रस्त्यांच्या कामास सुरूवात होवून आजमितीस सदर रस्त्यांची कामे अपूर्णावस्थेत आहेत, हेही खरे आहे काय,

(३) सदरहू काम सुरू झाल्यानंतर निकृष्ट दर्जाच्या कामामुळे व योग्य प्रमाणात डांबर, खडी यांचा वापर न करता अयोग्य रितीने कामकाज केले जात असल्याने तेथील ग्रामस्थांनी सदरहू रस्त्यांचे काम ७ ते ८ वेळा बंद पाडून शासनाचे लक्षही वेधले होते, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू कामास झालेल्या दिरंगाईबाबत तसेच निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत जबाबदारी निश्चित करून संबंधित अधिकारी तसेच ठेकेदारांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नांकीत रस्ता खराब झाल्याने अपघात झाल्याची नोंद पोलिस दप्तरी नसल्याचे पोलिस ठाणे, दोडामार्ग यांनी प्रमाणित केले आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी आंदोलने झाली आहेत.

(२) सन २०१४-१५ या वर्षामध्ये प्रश्नाधीन रस्त्याच्या लांबीत मंजूर असलेली सर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चांदूर बाजार (जि.अमरावती) तालुक्यातील विश्रोळी येथे आदिवासी वस्तीमध्ये ठक्करबाप्पा योजनेअंतर्गत रस्ता बांधकामात कंत्राटदार गैरप्रकार करीत असल्याबाबत

**(४१) * ६२३६७ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर बाजार (जि.अमरावती) तालुक्यातील विश्रोळी येथे आदिवासी वस्तीमध्ये ठक्करबाप्पा योजनेअंतर्गत रस्ता काँक्रीटीकरणाचे काम सुरु असून या बांधकामात कंत्राटदार गैरप्रकार करीत असल्याचा आरोप येथील नागरिकांनी लोकप्रतिनिधीकडे केला असून आदिवासी प्रकल्प कार्यालयाने याची चौकशी करावी, अशी मागणीही केली असल्याचे माहे मार्च, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ता बांधकामाच्यावेळी कोणताही शासकीय अधिकारी हजर राहत नसल्यामुळे कंत्राटदार हे मनमानी करुन कामात गैरव्यवहार करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनस्तरावरुन चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) त्यानुसार दोषी कंत्राटदारांवर शासन कारवाई करणार आहे काय, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती व प्रकल्प कार्यालय, धारणी या कार्यालयास असे निवेदन प्राप्त नाही.

तथापि, दिनांक ३१/०३/२०१६ रोजी दै. देशोन्नती या वर्तमानपत्रामध्ये विश्रोळी येथील ठक्करबाप्पा योजनेच्या कामाबाबत चौकशी करण्याची आदिवासी नागरिकांची मागणी अशी बातमी प्रसिध्द झाली आहे.

(२) हे खरे नाही.

सदर कामावर सहाय्यक अभियंता व उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, चांदुरबाजार, यांचेकडून कामाचा दर्जा तसेच गुणवत्तेबाबत वेळोवेळी दौरे झालेले असून कामाचा दर्जा उत्तम असून सदरचे काम समाधानकारक पूर्ण झाले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खेडी भोकरी (ता.चोपडा, जि.जळगांव) येथील तापी नदीवर कायमस्वरुपी पूल बांधण्याबाबत

**(४२) * ६२७३२ श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेडी भोकरी (ता.चोपडा, जि.जळगांव) येथील तापी नदीवर दरवर्षी माहे जानेवारी महिन्यात हंगामी पुल तयार करण्यात येतो आणि जून महिन्यात काढला जातो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी उपरोक्त नदीवर कायम स्वरुपाचा पुल बांधण्यात यावा अशी परिसरातील नागरिक मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पूल कायमस्वरुपी बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच उक्त पुलाच्या कायमस्वरुपी बांधकामाकरीता निधीची तरतूद केली जाणार आहे काय, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) होय.

(३) व (४) प्रस्तूत प्रकरणी निम्न तापी प्रकल्प, पाडळसे या प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रातील विषयांकित पुलाचे काम जलसंपदा विभागाकडून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरीत करण्याचे काम प्रगतीत आहे. त्यानंतर जलसंपदा विभागाने निधी दिल्यानंतर काम हाती घेण्यात येईल.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.